महाराष्ट्र शासन

# महाराष्ट्र राज्य कौशल्य, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण मंडळ

4 था मजला, शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था, मुलुंड, बाळासाहेब ठाकूरवाडी, मिठागर रोड, मुलुंड (पूर्व), मुंबई 400 081
Website: https://msbsvet.edu.in Email: msbve.secretary@dvet.gov.in दुरध्वनी क्र.: 08655944851/52/53

**परिपत्रक** पत्र क्र. का.क्र.का-४/प्रवेश/२०२५/९४१

प्रवेश सत्र ऑगस्ट २०२५ दिनांक -२८.०५.२०२५

विषय: प्रवेश सत्र ऑगस्ट २०२५ साठी प्रवेश वेळापत्रक...

१. मंडळांतर्गत राबविण्यात येणाऱ्या प्रमाणपत्र ( Certofocate) , पदविका (Diploma) व प्रगत पदविका (Advance Diploma) अभ्यासक्रमांत प्रवेशासाठी प्रवेश सत्र ऑगस्ट २०२५ साठीची प्रवेश प्रक्रिया खालील वेळापत्रकाप्रमाणे राबविण्यात येणार आहे.

| अ.क्र. | कार्यवाही | प्रारंभ दिनांक | अंतिम दिनांक |
|---|---|---|---|
| ०१ | प्रवेश सत्र ऑगस्ट २०२५ साठी उमेदवारांची नोंदणी करणे (Registration) | दि.०१.०६.२०२५ | दि.३१.०७.२०२५ |
| ०२ | प्रवेशसाठी संस्थानिहाय अर्ज करणे | दि.०१.०७.२०२५ | दि.३१.०७.२०२५ |
| ०३ | संस्थांव्दारे प्रवेश निश्चित करणे | दि.०१.०७.२०२५ | दि.३१.०७.२०२५ |
| ०४ | प्रशिक्षण वर्ष २०२५-२६ साठी नियमित प्रशिक्षण सुरु करणे | दि.०१.०८.२०२५ | |
| ०५ | जिल्हा कार्यालयांव्दारे प्रवेश मान्यता देणे | दि.०१.०७.२०२५ | दि.३१.०८.२०२५ |

२. प्रवेशोच्छुक उमेदवारांकरिता व व्यापक प्रसिध्दीकरिता प्रवेश वेळापत्रक सहपत्रित करण्यात येत आहे.

३. राज्यातील प्रशिक्षण संस्थांमधील प्रवेश क्षमतांचा पूर्ण वापर व्हावा व प्रशिक्षणाच्या १००% जागा भरल्या जाव्यात या करीता " प्रवेश प्रोस्ताहन अभियान " राबविण्यात यावे. या अभियानांतर्गत मंडळाच्या अभ्यासक्रमांची माहिती, शिकाऊ प्रशिक्षण योजना, रोजगार व स्वयंरोजगाराच्या उपलब्ध होणाऱ्या संधी, अभ्यासक्रमांची समकक्षता, उच्च शिक्षणाची संधी, इत्यादी बाबत माहिती प्रसार माध्यम व समाजमाध्यमांव्दारे प्रसिध्द करण्यात यावी. राज्यात आयोजित होणाऱ्या विविध मार्गदर्शन शिबिरे, समुपदेशन शिबिरे, रोजगार मेळावे, इत्यादी मध्ये संस्थांनी सहभाग घेऊन मंडळाच्या अभ्यासक्रमांची माहिती प्रवेशोच्छुक उमेदवार व पालकांना द्यावी.

४. प्रवेश प्रक्रिया विहित वेळेत पूर्ण करणे, प्रवेश पूर्ण क्षमतेने होणे, प्रशिक्षणाची गुणवत्ता उंचावणे व प्रशिक्षणार्थ्यांना शिकाऊ प्रशिक्षण योजना, रोजगार, स्वयंरोजगार व उच्च शिक्षणाच्या संधी उपलब्ध करुन देण्यासाठी सर्व संस्था , जिल्हा व प्रादेशिक कार्यालय यांनी प्रयत्न करणे आवश्यक आहे.

(योगेश सुरेश पाटील)
संचालक

प्रत: माहितीसाठी

१. मा.अपर मुख्य सचिव, कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभाग, मुंबई ३२

२. मा.संचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई ०१

प्रत: माहिती व पुढील कार्यवाहीसाठी

१. जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण अधिकारी, सर्व

२. मंडळाचे अभ्यासक्रम राबविणाऱ्या मान्यता प्राप्त व इच्छुक संस्था

३. संगणक विभाग (मंडळाच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध करणेकरिता)

४. निवडनस्ती